११ मार्च ०५ पुढारी

# प्राचार्य कटांबळे, अभयकुमार साळुंखे यांच्यासह २१ जण 'कोल्हापूर भूषण'

कोल्हापूर : सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या 'कोल्हापूर भूषण' पुरस्कारांची यादी अखेर गुरुवारी रात्री जाहीर करण्यात आली. २१ जणांच्या यादीमध्ये प्राचार्य व्ही. डी. कटांबळे, प्रा. अभयकुमार साळुंखे, पी. जी. मेंढे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. साधना झाडबुके तसेच पत्रकारितेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दै. 'पुढारी'चे मुख्य बातमीदार चंद्रशेखर माताडे आदींचा समावेश आहे.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी 'कोल्हापूर भूषण' पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीच्या पुरस्कारासाठी ८७ प्रस्ताव आले होते. त्यावर गेल्या दहा-पंधरा दिवसापासून चर्चा सुरू होती. अखेर आज दिवसभर यादी निश्चित करण्याच्या उद्देशाने एका ठिकाणी महापौर नंदकुमार वळंजू व सर्व पदाधिकारी बसले. या बैठकीत यादीवर एकमत नव्हते. प्रत्येकजण आपापल्या माणसाच्या नावाचा आग्रह धरत होते. (पान दोनवर)

# प्राचार्य कटांबळे, अभयकुमार साळुंखे यांच्यासह २१ जण 'कोल्हापूर भूषण'

(पान १ वरून)

रात्री दहा वाजले तरी यादीवर एकमत होत नव्हते.

या पुरस्काराचे वितरण शनिवार दि. १२ मार्च रोजी होणार असून या समारंभास सांस्कृतिक कार्य मंत्री अशोक चव्हाण, सहकार मंत्री डॉ. पतंगराव कदम उपस्थित राहणार आहेत.

कोल्हापूर भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे पुढीलप्रमाणे : प्राचार्य डॉ. व्ही. डी. कटांबळे (शैक्षणिक क्षेत्र), प्राचार्य अभयकुमार गोविंदराव साळुंखे (शैक्षणिक कार्य), पी. जी. मेंढे, (साखर उद्योगामध्ये विशेष कार्य), क्रांतीकुमार रंगराव पाटील (महिला शिक्षणासाठी खास प्रयत्न), बाबूराव धारवडे (सामाजिक कार्य), शिवाजीराव पाटोळे (सामाजिक कार्य मातोश्री वृद्धाश्रम), डॉ. साधनाताई झाडबुके (सामाजिक कार्यकर्ते), बाळ जमेनीस (संगीत दिग्दर्शक, अभिनेता, रंगभूमी नायक) प्रा. संभाजीराव पाटील (क्रीडा प्रशिक्षक), वसंत वामन शिखरे ऊर्फ बापू शिखरे (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते), डॉ. माधव विश्वनाथ नागावकर (वैद्यकीय क्षेत्र) डॉ. उद्धव आनंदराव पाटील (प्लॅस्टिक सर्जन), नरेंद्र भास्कर माटे (अॅडप्ट कन्सल्टंट), तुकाराम ऊर्फ काकासाहेब शंकरराव लकडे (ज्येष्ठ समाजसेवक) गोपीनाथ दिनकरराव मुळीक (मर्दानी व फुटबॉलपटू), चंद्रशेखर माताडे (पत्रकार क्षेत्र), प्रदीपभाई लक्ष्मीदास कापडिया (कुशल उद्योजक), नंदकुमार गजानन ओतारी (पत्रकार क्षेत्र), एस. एस. मोमीन (सचिव, बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य), सुभाष बापूसो चौगुले (सुज्ञ व्यापारी उद्योगपती), विश्वास कांबळे (फुटबॉल खेळाडू व प्रशिक्षक).